**प्रकल्प प्रवर्तक मे. दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड यांचा मौजे - भिवपुरी, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथील प्रस्तावित भिवपुरी (१,००० मेगावॅट) ऑफ-स्ट्रीम ओपन लूप उदंचन जलविद्युत प्रकल्प (पीएसपी) साठी संकलनात सुधारणा करण्याच्या संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृत्त -**

प्रकल्प प्रवर्तक मे. दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड यांचा मौजे – भिवपुरी, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथील प्रस्तावित भिवपुरी (१,००० मेगावॅट) ऑफ-स्ट्रीम ओपन लूप उदंचन जलविद्युत प्रकल्प (पीएसपी) साठी संकलनात सुधारणा करण्याच्या संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक १२ एप्रिल, २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थळ – दी टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, भिवपुरी जल विद्युत केंद्र, मुक्काम पोस्ट - भिवपुरी कॅम्प, तालुका - कर्जत, जिल्हा- रायगड (४१०२०१), महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. रा. सं. कामत, उप प्रादेशिक अधिकारी, रायगड - २, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४१० २०१ तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री संदेश शिर्के, अपर जिल्हादंडाधिकारी, जिल्हा-रायगड तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. जयवंत शं. हजारे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, पोलिस प्रशासन व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना आगाऊ पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ए, सेक्टर १ (सी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य

जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे, आणि प्रकल्पामुळे विस्तापित होणा-या जनतेच्या रहिवाशांच्या समस्या जाणून घेणे हा आहे. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीत सहभागी असलेल्या स्थानिकांनी, जनतेने प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेल्या पर्यावरणीय सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप यांची नोंद घेऊन त्याचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करणे व सदरहू इतिवृत शासनास सादर करणे हा आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ०७.०८.२०२३ रोजी सादर केला व त्या अर्जास ऑनलाईन मंजूरी दिनांक २३.०९.२०२३ रोजी प्रदान केली आणि सदरहू प्रकल्पास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यास अनुमती प्रदान केलेली आहे. त्यानुसार प्रकल्प प्रवर्तकांनी प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन शासनास सादर केलेला आहे.

त्यानंतर प्रकल्प प्रवर्तक मे. दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड यांचा त्यांच्या मौजे – भिवपुरी, तालुका-कर्जत, जिल्हा- रायगड, महाराष्ट्र येथील प्रस्तावित भिवपुरी (१,००० मेगावॅट) ऑफ-स्ट्रीम ओपन लूप उदंचन जलविद्युत प्रकल्प (पीएसपी) साठी संकलनात सुधारणा करण्याच्या संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास रितसर ऑनलाईन अर्ज दिनांक १९.०२.२०२४ रोजी सादर केला.

सहसंचालक(जप्रनि), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र दिनांक २३.०२.२०२३ नुसार उप प्रादेशिक कार्यालय-रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई – ४१० २०१ यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

मा. जिल्हाधिकारी, रायगड यांनी त्यांच्या दिनांक ०७.०३.२०२४ च्या पत्रान्वये प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास शुक्रवार, दिनांक १२ एप्रिल, २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४.०९.२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१.१२.२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- १२९ /२०२४, व्दारा पत्र क्रं.बीओ /जेडी/ डब्लुपीसी / पीएच / बी-२४०४०२-एफटीएस-०२३५ दिनांक – ०२.०४.२०२४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी,रायगड, - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई - **सदस्य**
यांचे प्रतिनिधी –
प्रादेशिक अधिकारी -रायगड,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई – ४१० २०१

३) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२ - **आयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई – ४१० २०१

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, रायगड - २, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक कृषिवल आणि दैनिक रायगड टाईम्स यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत ११ मार्च, २०२४ रोजी जनसुनावणीबाबत जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती.

त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या अवलोकनार्थ व माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात माहितीसाठी आणि अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर – ४४० ००१.
२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अलिबाग, रायगड, जिल्हा-रायगड.
३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अलिबाग, रायगड, जिल्हा-रायगड.
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, अलिबाग, रायगड, जिल्हा-रायगड.
५) उप विभागीय अधिकारी, कर्जत, उप विभाग-कर्जत, तालुका – कर्जत, जिल्हा-रायगड.
६) उप विभागीय अधिकारी, अलिबाग, तालुका- अलिबाग, जिल्हा- रायगड.
७) तहसीलदार, कर्जत, तालुका- कर्जत, जिल्हा- रायगड.
८) तहसीलदार, अलिबाग, तालुका-खेड, तालुका- अलिबाग, जिल्हा- रायगड.
९) पोलिस अधिक्षक, तालुका- अलिबाग, जिल्हा- रायगड.

१०) **ग्रामपंचायत कार्यालय-** टेंभरे, पाथ्रज, वाकस, खांडस, मोगराज, नरसापूर, चिंचवली, सावळे, मांडवणे, भालिवडी, कडाव, वावळोली, सावेळे, कोंडीवडे, आंबीट, वैजनाथ, भिवपुरी, हुमगाव, पोटल, पाली (ट), कोथळ खलाटी, वरइ (ट), नीड, गौरकामत, वडप, वेनगाव, खांडपे, तिवरे, बोरीवली, कशेळे, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड.

११) संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

१२) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण यनियंत्रण मंडळ – मुख्यालय, कल्पतरू पॉईंट, ३ रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.

१३) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४१० २०१.

१४) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४१० २०१ .

१५) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४१० २०१ यांना एक सूचना व एक आक्षेप ईमेलव्दारे प्राप्त झालेले आहेत. सदरहू सूचना दिनांक ०८.०४.२०२४ रोजी श्री. सुनंदा रेड्डी, अध्यक्ष, धरित्री पर्यावरण प्रशिक्षण संस्था, नालगोंडा, तेलंगणा यांच्याकडून प्राप्त झालेली असून त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना व बिनशर्त पाठिंबा दर्शविल्याचे कळविलेले आहे.

तसेच श्री. प्रसाद खाले, वरिष्ठ संरक्षण अधिकारी यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात ९६ (शहाण्णव) त्रुटीबाबत खुलासा करण्याचा त्यांचा आक्षेप ईमेलव्दारे ११.०४.२०२४ ला प्राप्त झालेला असून सदरहू आक्षेपांबाबत प्रकल्प प्रवर्तकांना पुढील कार्यवाहीसाठी अवगत करण्यात आलेले आहेत. वरिल आक्षेपांबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली लेखी उत्तरे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना बैठकीच्या इतिवृतासोबत सादर करण्यात येतील.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरण विषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची

इतिवृत्तात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप, प्राप्त झालेल्या लेखी सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश दिले,

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प प्रवर्तक यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पासाठी एकूण खर्च अंदाजे रुपये ४७४३.५९ कोटी असून पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवली खर्च अंदाजे - रुपये २३.७६ कोटी तर आवर्ती खर्च - रुपये ४४.३६ कोटी रुपये ७ वर्षाकरिता आहे. प्रकल्पात बांधकाम टप्प्यात सुमारे १,००० ते १,५०० तात्पुरत्या व्यक्तींची गरज असून सर्व मनुष्यबळ हे स्थानिक गावातूनच घेतले जातील.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्प हा १,००० मेगावॅट क्षमतेचा भिवपूरी उदंचन जलविद्युत प्रकल्प हा रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात मौजे भिवपुरी कॅम्प येथे नियोजित आहे. सदरहू प्रकल्पात इंद्रायणी नदी खो-यातील मौजे वडेश्वर, तालुका-मावळ, जिल्हा-पुणे येथील विद्यमान ठोकरवाडी धरण जलाशय उर्ध्व जलाशय (Upper Reservoir) म्हणून वापरण्यात येणार असून येथे ५५० मीटर खाली पाणी आणण्यात येऊन रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील मौजे-भिवपुरी कॅम्प येथे नविन निम्न जलाशय (Lower Reservoir) करिता दगडी-धरण बांधण्यात येणार आहे.

त्यांनी सांगितले की उदंचन जल प्रकल्प म्हणजे येथे एक उर्ध्व/वरच्या बाजूस व निम्न/खालच्या बाजूस जलाशय लागतो. पाणी वाहून नेण्याची यंत्रणा, पॉवर हाऊस, जनरेटर. देशात सौर उर्जा व पवन उर्जा यांचे उत्पन्न घेण्याचे प्रमाण फक्त भारतात नाही, तर जगभर वाढतच चालले आहे. सौर उर्जा ही दिवसाच्या काही काळापर्यंतच मिळते, तर पवन उर्जा ही हंगामी स्वरुपाची म्हणजे बेभरवशाची आहे. तर सौर उर्जा ही तयार झाल्यानंतर साठविली तर ती चोवीस तास आपल्याला पाहिजे तेव्हा वापरता येऊ शकते. तर पर्यावरण स्नेही व स्वस्त साठवण करून पाहिजे तेव्हा वापरण्यासाठी एक यंत्रणा उपलब्ध आहे, ती म्हणजे उदंचन जल विद्युत प्रकल्प. जेव्हा सौर उर्जा उपलब्ध असते, त्यावेळी ती पंप व मोटरसाठी वापरण्यात येते. खालच्या जलाशयाचे पाणी हे वरच्या जलाशयात जवळजवळ ५५० मीटर उंच जलाशयात टाकण्यात येते. जेव्हा सौर उर्जा उपलब्ध नसते व वीजेची मागणी असते, त्यावेळी ते वरच्या जलाशयाचे पाणी त्याच

मशिनला टर्बाईन व जनरेटर म्हणून वापरतो, वीज निर्मिती करुन ग्रीडमध्ये पॉवर देण्यात येते व खालच्या जलाशयात पाणी साठविण्यात येते. हा उदंचन जलविद्युत प्रकल्पाचा भाग आहे. भीरा येथे गेले २५ वर्षे उदंचन जलविद्युत प्रकल्प कार्यरत आहे. नकाशात दाखविल्याप्रमाणे प्रकल्पाचा ८०% भाग हा रायगड जिल्ह्यात, २०% भाग हा पुणे जिल्ह्यात येतो.

प्रकल्प बांधकाम टप्प्यात असताना कामगार वसाहत व विविध बांधकाम उपक्रमातून निर्माण होणारे सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येईल. शोषखड्डे, मलनिःस्सारण प्रक्रिया ही करण्यात येईल. प्रकल्प बांधकाम टप्प्यात वाहनांची वाहतुक, ब्लास्टींगमुळे ध्वनि प्रदूषण होऊ शकते. त्याबाबत विविध उपाय करण्यात येतील.

प्रकल्पात उत्पन्न होणा-या ई-कच-याची (e-waste) विल्हेवाट ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार करण्यात येईल. येथील पर्यावरणास काहीही हानी पोचणार नाही.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की पर्यावरण व्यवस्थापन योजनेतर्गत विविध घटकांवर खर्च करण्यात येईल. टाटा पॉवर येथे शंभर वर्षापेक्षा जास्त वर्षे कार्यरत आहे. त्यामुळे टाटा समुह व येथील कर्जत तालुक्यातील स्थानिक जनता हे एक कुटुंब या नात्याने येथे नांदत आहोत. प्रकल्प प्रवर्तक परिसरात विविध सामाजीक, शैक्षणिक उपक्रम राबवित असतो. क्लब एनर्जी उपक्रमात उर्जेची बचत कशी करायची हे शाळेतील मुलांसाठी सांगण्यात येते. ब-याच शासकीय योजना या समाजातील गरजु व्यक्तींपर्यंत पोहचत नाहीत. तर याबाबत जनजागृती करण्यासाठी जे उपक्रम राबविण्यात येतात उदा – सुकन्या समृध्दी योजना ही केंद्र शासनाची खास मुलीसाठी योजना आहे, ती ब-याच लोकांना माहित नाही, अशा योजना लोकांपर्यत पोहचविण्याचे काम टाटा पॉवर करते.

प्रकल्पातर्फे अनोखा धागा हा उपक्रम राबविण्यात येतो. तेथे महिलांना शिवणकामाचे प्रशिक्षण दिले जाते. त्या उपक्रमाच्या माध्यमातून येथील स्थानिक महिलांनी कोविडच्या काळात सर्वोत्तम काम केलेले आहे. त्यांनी लाखो मास्क तयार करुन ते देशपातळीवर पुरविलेले आहेत. अनोखा धागा उपक्रमाच्या विविध शाखा या भिवपुरी, भिरा, जिल्हा-रायगड आणि वडेश्वर, मुळशी, जिल्हा-पुणे येथे आहेत. कोविड काळात आम्ही जेव्हा मास्क वापरत होतो, त्यावेळी या उपक्रमातील मास्क वापरत असल्याने आम्हांला त्या स्थानिक महिलांचा अभिमान वाटत असे.

तसेच पापड लाटण्याचे मशिनसुध्दा येथील स्थानिक महिलांना पुरविण्यात आलेले असून त्याचा लाभ ते घेत आहेत. येथील महिलांना कुटीरोद्योग चालविण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येते. त्यासाठी सेल्को फाऊन्डेशनबरोबर आम्ही व्दिपक्षीय करार केलेला आहे. येथील मशिन्स आहेत, ते सौर उर्जेवर चालणा-या आहेत.

पौगंडावस्थेत असणा-या मुलींमध्ये आरोग्याबाबत जागृतता निर्माण करण्याचा कार्यक्रम आम्ही वेळोवेळी हाती घेत असतो.

ग्रामीण भागातील शाळांना सर्वात मोठा प्रश्न भेडसावतो, तो म्हणजे वीजेचा पुरवठा. ब-याच वेळा लोड शेडिंग असते, शाळेतही संगणकावरच शिकवत असल्याने वीजेच्या उपलब्धतेशिवाय काहीही चालू शकत नाही. तर ई-लर्निग कीट्स पुरवून शाळेतील मुलांची गुणवत्तेत कशी वाढ करता येईल याबाबत आम्ही काम करत आहोत. तसेच नवनीत गाईड्सुद्धा पाचशेपेक्षा जास्त स्थानिक विद्यार्थ्यांना पुरविण्यात आलेली आहेत.

**<u>प्रकल्पाचे फायदे</u>** - प्रकल्प बांधकाम टप्प्यात १०००-१५०० तात्पुरत्या स्वरुपाचे लोक विविध कौशल्य असणारे येथे काम करणार आहेत. प्रकल्प प्रवर्तकांचा प्रयत्न आहे की येथील जास्तीतजास्त स्थानिकांना म्हणजे रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील लोकांना रोजगाराची संधि देण्यात येईल.

या प्रकल्पामुळे येथील सामाजिक आणि आर्थिक जीवनमान स्तर उंचावेल. हा सर्वात स्वस्त, स्वच्छ उर्जा साठवणुकीचा प्रकल्प आहे. अशा प्रकल्पांची फक्त महाराष्ट्रालाच नाही, तर देशालाही खूपच गरज आहे. हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर अशा प्रकारचा देशातील सर्वात मोठा प्रकल्प असेल. त्याचा आपल्या सर्वांनाच अभिमान वाटणार आहे. या प्रकल्पात आपल्या सर्वांचाच सहभाग असणार आहे.

सादरीकरणात पूर्ण झाल्यानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्प बांधकाम टप्प्यात व पूर्ण झाल्यानंतर प्रदूषण नियंत्रणासाठी योजण्यात येणाऱ्या पर्यावरण व्यवस्थापन योजनांविषयी (ईएमपी) सविस्तर माहिती दिलेली आहे. त्यांनी उपस्थितांना आवाहन केले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत. सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम नांव व राहण्याचे ठिकाण/गाव सांगण्यात यावे. सर्वांच्या सूचना, आक्षेप यांची नोंद करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे ज्यांना लेखी निवेदन सादर करावयाचे आहेत, ते त्यांनी सादर करावेत. त्यास प्रकल्प प्रर्वतकांकडून लेखीस्वरुपात उत्तर देण्याची सूचना करण्यात येत असून ते बैठकीच्या इतिवृतासोबत शासनास सादर करण्यात येईल. तरी एकाएकाने येऊन लेखी निवेदन सादर करावे.

**<u>उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-</u>**

१) **श्री. पंढरीनाथ गणपत आगज, माजी सरपंच, मुक्काम पोस्ट- मांडवणे, तालुका- कर्जत, जिल्हा-रायगड:-**

मी अनेक ठिकाणी विविध स्तरावर सामाजिक कार्य करत असतो. या टाटा कंपनीत आमची एक संस्था आहे, तेथेही मी अध्यक्ष म्हणून काम करतो. मी पहिल्यापासून अगदी जवळून हा प्रकल्प पाहिलेला आहे. पहिल्या प्रकल्पापासून शेतक-यांना, परिसरातील सर्व लोकांना या तालुक्यातून दुबार पीक आम्हां शेतक-यांना मिळते. त्याचा फायदा आम्हांला मिळतो. मात्र जलसिंचनाचे काम चालू असल्याने गेले दहा वर्षे काही भागातील शेती फुकट गेली. आता ती पूर्ववत स्थितीत चालू झालेली आहे. असाच फायदा या प्रकल्पापासून व्हावा, असे माझे वैयक्तिक मत आहे.

**सुचना** - सादरीकरणात दर्शविलेले आहे की १,००० मेगावॅट प्रकल्प कार्यरत झाल्यानंतर हा प्रकल्प देशातील सर्वात मोठा प्रकल्प असेल. ही अभिमानास्पद बाब असून त्याचा मान या भागास मिळणार आहे. भविष्यातसुध्दा शेतीला, पर्यावरणाला पुरक असेच व्यवस्थापन कंपनीने करावे असे माझे वैयक्तिक मत आहे. कोणाच्याही शेतीचे नुकसान होऊ नये. प्रकल्पातील घन कचरा, सांडपाणी याचे नियोजन कंपनीकडून चांगल्याप्रकारे करण्यात यावे. आमचे पूर्ण सहकार्य या परिसरातून कंपनीस असेल.

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर देताना सांगितले की गेले शंभर वर्षे टाटा पॉवरने परिसरात जे योगदान दिलेले आहे, त्याचा उल्लेख केला व त्याची पावती दिली. या प्रकल्पात जो घनकचरा, सांडपाणी निर्माण होईल, त्यावर प्रक्रिया व विल्हेवाट ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या निर्देशांनुसारच करण्यात येईल.

२) **श्री. विलास मधुकर मोडक, माजी सरपंच, राहणार-सावळे, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड:-**

**प्रश्न** - या प्रकल्पातून जल प्रदूषण होईल काय? असल्यास, ते नियंत्रणात आणण्यासाठी कंपनीकडून काय उपाययोजना करण्यात येतील, याची माहिती देण्यात यावी.

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की ही जलविद्युत प्रकल्प असल्याने प्रकल्पातून जल प्रदूषण होणार नाही. बांधकाम टप्प्यात जे सांडपाणी उत्पन्न होईल, मोठ्या वाहनांच्या ये-जा, रहदारीमुळे येथील पाणी साठा प्रदूषित होऊ नये म्हणून सर्व उपाययोजना करण्यात येतील.

३) **श्री. सुनील बार्शी, राहणार-हुमगाव, जिल्हा-रायगड:-**

**प्रश्न** - प्रकल्प बांधकाम टप्प्यात ध्वनि प्रदूषण होईल काय? ते आटोक्यात आणण्यासाठी कोणते उपाययोजना अंगिकारण्यात येणार आहेत?

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की ध्वनि प्रदूषण हे थोड्या प्रमाणात होऊ शकते, पण त्यावर उपाययोजनासुध्दा करता येतात. प्रकल्पात ब्लास्टींग करावे लागेल. त्यापासून ध्वनी प्रदूषणाचा त्रास होऊ नये म्हणून प्रकल्पात कंट्रोल ब्लास्टींगच करण्यात येईल. तसेच गरजेनुसार मफलिंग करण्यात येईल.

त्यामुळे ध्वनि प्रदूषण हे विहित मानकांमध्येच (Prescribed Standards) राहील. तो प्रकल्पाचा एक भागच आहे. त्याचप्रमाणे केंद्र व राज्य सरकारचे विविध विभाग प्रकल्प संमत करताना या अटी व शर्ती पारित करत असते आणि प्रकल्प प्रवर्तकांना ते पाळणे बंधनकारक आहे.

४) **श्री. विलास धोंडू नवले, राहणार-तापकीरवाडी, जिल्हा-रायगड:**

**प्रश्न** - आम्ही बंधा-यापासून पन्नास मीटर अंतरावर राहत आहोत. अहवालात नमुद केलेले आहे की प्रकल्प विकसित करताना ब्लास्टींग करण्यात येईल. त्यामुळे आमच्या घरांचे नुकसान आणि आमच्या बोअरिंगचा पाण्याचा प्रवाह बदलेल. कारण आमच्या घरापासून दहा कि.मी. अंतरावर एच.पी.ची पाईपलाईन टाकत असताना आमच्या घरातील भांडी पडत होती. त्यामुळे होणारे नुकसान हे आम्ही अनुभलेले आहे.

दुसरा मुद्दा शेतीचा. आमची शेती या प्रकल्पाच्या पन्नास मीटर अंतरावरच आहे. बंधाऱ्यात पाणी साठविल्यानंतर आमच्या शेतात पाण्याचा कायमचा निचरा होण्याची शक्यता आहे. आमचे शेत पाणी जास्त प्रमाणात राहिल्याने नापीक होण्याची शक्यता आहे. तरी भविष्यातील नुकसानाभरपाईसाठी तापकीरवाडीतील रहिवाशांना कंपनीने लेखीस्वरुपात आश्वासन द्यावे. त्याचप्रमाणे याबाबत करण्यात येणा-या उपाययोजनांची माहिती बैठकीत सांगण्यात यावी.

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर देताना सांगितले की बैठकीत अगोदरच सांगितलेले आहे की प्रकल्प विकसित करताना कंट्रोल ब्लास्टींग करण्यात येणार आहे. त्यानुसार आजूबाजूच्या कुठल्याही घरांचे नुकसान होणार नाही, याची काळजी घेणे ही आमची जबाबदारी आहे. त्याप्रमाणे ब्लास्टींग करण्यात येईल.

त्याचप्रमाणे आपल्या शेतात पाणी जाणार नाही, याची काळजी घ्यायची जबाबदारी आमचीच आहे.

**प्रश्न** - त्यावेळी काही उपस्थितांनी एकत्रितपणे याबाबत हमी कंपनी कशी देणार असा प्रश्न उपस्थित केला.

**सुचना** - त्यावेळी, अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की बैठकीचे संपूर्ण व्हिडिओ रेकॉर्डींग होत असून बैठकीच्या इतिवृत्तात सर्व प्रश्नांचा आणि कंपनीने दिलेल्या सर्व उत्तरांचा समावेश करण्यात येत असतो. इतिवृत्ताची प्रत्येक प्रश्नाचे देण्यात आलेले उत्तर नमुद असते. त्याचप्रमाणे त्या इतिवृत्ताची प्रत ही स्थानिकांना उपलब्ध करता येऊ शकते.

**प्रश्न** - त्यावेळी श्री. विलास धोंडू नवले यांनी मत मांडले. अध्यक्षांनी याबाबतची भूमिका स्पष्ट केली. पण भविष्यात घरांचे नुकसान झाले, शेती नापीक झाली, बोअरिंगच्या पाण्याचा प्रवाह बदलला तर भविष्यात काय उपाययोजना करण्यात येतील?

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की टाटा पॉवरची जबाबदारी राहिल.

**प्रश्न** - श्री. नवले यांनी नेमकी जबाबदारी कुठली राहिल अशी विचारणा केली. नुकसानभरपाईबाबत लेखी आश्वासन ग्रामस्थांना देणार काय?

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की आताच अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीतील चर्चा ही रेकॉर्डिंग होत आहे. त्यामुळे तो एक पुरावाच आहे.

५) **श्री. मंगेश रामचंद्र शितोळे, राहणार – भिवपुरी कॅम्प, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड:- ग्रुप ग्रामपंचायत क्षेत्र – रहिवाशी-स्थानिक -९९२२९९६७०१-ईमेल आय डी - mangesh776@gmail.com**

**सुचना** - त्यांनी विश्लेषणात्मक अहवाल वाचण्यास सुरवात केली. त्यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालास उत्तर आहे –

त्यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांनी १,००० मेगावॅट प्रकल्पाचा जो अहवाल तयार केलेला आहे, त्यासाठी आधार १२५० मेगावॅट हैद्राबाद येथील या कंपनीची प्रतिस्पर्धी असणा-या कंपनीचा घेतलेला आहे. त्यांनी सांगितले की अहवालात असलेल्या त्रुटी सुधारुन त्यास पर्यायी उपाय सूचविलेले आहेत. प्रकल्प कार्यान्वित करणे हा आमचा उद्देश आहे, प्रकल्पास विरोध नाही. ईआयए अहवालातील त्रुटींना पर्यायी उपाय सांगितलेले आहेत. त्यांनी त्यांचे सहकारी ही अहवाल वाचतील असे सांगितले.

६) **श्री. संजय प्रभाकर रौन्धळ, ग्रुप ग्रामपंचायत, भिवपुरी,मुक्काम -कराळेवाडी, जिल्हा-रायगड:-**

**प्रश्न** - त्यांनी सांगितले की स्थानिक ग्रुप ग्रामपंचायत-भिवपुरी, कर्जत, रायगड येथील ग्रामस्थांचा त्यांनी तयार केलेला ईआयए पडताळणी अहवाल वाचण्यास सुरवात केली. त्यांनी सांगितले की धरणाची उंची, खोली, लांबी याची माहिती अपूर्ण वाटते. कारण ती स्पष्ट स्परुपात दिलेली नाही. पाण्याची घनता मोजण्यासाठी लांबी, उंची, रुंदी आवश्यक आहे.

**सुचना** - त्यांचे अहवाल वाचन चालू असताना सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी संबंधित व्यक्तीस विशिष्ट प्रश्न विचारण्याची विनंती केली. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर

जनसुनावणी समिती यांनी सूचना केली की प्रश्नांना उत्तर देण्यास कंपनी प्रशासन बांधिल आहे. तसेच आपण केलेला अभ्यास अहवाल सादर करण्यात यावा, तो इतिवृत्तासोबत शासनास सादर करण्यात येईल.

**प्रश्न** - त्यावेळी श्री. मंगेश रामचंद्र शितोळे, राहणार – भिवपुरी कॅम्प, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगडः- ग्रुप ग्रामपंचायत क्षेत्र_यांनी विचारणा केली की १०७.० मीटर खोली सांगण्यात आलेली आहे. ती बरोबर आहे का?

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे आपल्या लेखी स्वरुपातील प्रश्नांना लेखी उत्तर देण्यात येईल.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली की जर बैठकीत तोंडी प्रश्न विचारण्यात आले, तर त्याचे तोंडी उत्तर देण्यात यावे.

श्री. मंगेश रामचंद्र शितोळे, राहणार – भिवपुरी कॅम्प, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड यांनी येथे सांगितले की कंपनीने केलेल्या उपलब्ध अहवालानुसार आम्हांला ज्या त्रुटी आढळल्या, त्यावरच आम्ही प्रश्न विचारत आहोत. कारण येथील ग्रामस्थांना प्रस्तावित प्रकल्पामुळे भविष्यात होणारे पर्यावरणीय परिणाम कळण्यासाठी प्रश्न आहेत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ही समिती कुठलाही निर्णय घेत नाही. उपस्थितांनी विचारलेल्या सूचना, आक्षेप यांना कंपनीने दिलेली उत्तरे शासनास सादर करण्यात येतील. तसेच उपस्थितांना जर मुद्देसुद प्रश्न विचारले, तर प्रकल्प प्रवर्तकांना उत्तरे देणे हे बंधनकारक आहे.

त्यावेळी श्री मंगेश रामचंद्र शितोळे, राहणार – भिवपुरी कॅम्प, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड यांनी आक्षेप नोंदविला की जर १०७ मीटर खोलीचे स्पष्टीकरण प्रकल्प अधिकारी यांनी दिलेले नाही याची नोंद घेण्यात यावी.

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की जे निम्न जलाशय (lower reservoir) आहे, त्या धरणाची माथा पातळी उंची ही समुद्रसपाटीपासून १०७ मीटर उंची आहे. धरणाची उंची ही २० – २८ मीटर प्रत्येक ठिकाणी बदलणारी आहे. महत्तम उंची ही २८ मीटर आसपास आहे.

श्री. मंगेश रामचंद्र शितोळे, राहणार – भिवपुरी कॅम्प, यांनी_येथे आक्षेप नोंदविला की अहवालात धरणाची रुंदी दिलेली नाही. धरणाची रुंदी आणि उंची ही आवश्यक आहे. प्रकल्प अधिकारी यांनी ३३५ धरण माथा पातळी दिलेली आहे. जलाशयात जर ४६२.० कोटी दशलक्ष पाणी राहणार आहे, जर १०७ मीटर खोली धरली तर ३५२ फूट, आमच्या येथे ३० फुटांपर्यंत बोअरिंग लागते.

**प्रश्न** - तरी लक्षात घ्यावे याची परिणाम आमच्या बोअरिंगला व शेतीवर होणार आहे. आमच्या बोअरिंग बंद होतील. तरी आपण स्पष्टीकरण द्यावे की १०७ मीटर खोली कशी धरण्यात येते?

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की १०७ मीटर उंची म्हणजे समुद्रसपाटीपासून धरणाचा माथा ती उंची आहे. पाण्याची पातळी तेवढी नाही. पाण्याची पातळी ही जास्तीतजास्त २८ मीटर आहे. धरणाचा तळ व धरणाचा माथा त्यातील फरक बघितला पाहिजे आणि तेवढीच पाण्याची पातळी असते.

श्री. मंगेश रामचंद्र शितोळे, राहणार – भिवपुरी कॅम्प, यांनी दुस-या प्रकल्पाविषयी माहिती देण्यास सुरवात केली असता त्यांना ज्या प्रकल्पाविषयी जनसुनावणी आहे, त्या प्रकल्पाविषयीच मुद्दे मांडण्याची सूचना करण्यात आली. अध्यक्ष यांनी पर्यावरणविषयकच सूचना, आक्षेप नोंदविण्याची सूचना केली. त्यावेळी श्री. मंगेश शितोळे यांनी मत मांडले की १०७ मीटर उंची आणी ३५१ फूट खोली असेल तर त्या प्रकल्पाचा येथील पाण्यावर, शेतीवर व इतर घटकांवर होणार आहे. त्यासाठी माहिती मिळणे आवश्यक आहे.

**सुचना** - अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी मत मांडले की २८ मीटर उंची सांगितलेली आहे, त्यापेक्षा जास्त उंची प्रकल्प प्रवर्तकांना वाढविता येणार नाही याची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. प्रकल्प प्रवर्तकांना उंची वाढविणे असल्यास सर्व बंधनकारक शासकीय प्रक्रिया या पाळाव्यात लागतील.

७) **श्री. सुनील बार्शी, राहणार-हुमगाव, जिल्हा-रायगडः-**

**प्रश्न** - प्रकल्प परिसरात टाटा कंपनीतर्फे कोणत्या आरोग्यसुविधा पुरविण्यात येतील?

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की शंभर वर्षांपासून येथे प्रकल्प कार्यरत असून तेव्हापासूनच आमची वैद्यकीय सुविधा स्थानिक लोकांसाठी उपलब्ध आहे. ती वैद्यकीय सुविधा तशीच पुढे चालू राहणार आहे.

८) **श्री. प्रसाद थोरवे, मुक्काम -कराळेवाडी, तालुका-कर्जत,जिल्हा-रायगडः-**

गेले २५ वर्षे आम्ही टाटात काम करत आहोत. टाटा पॉवरने शंभर वर्षात येथील स्थानिकांना रोजगाराची संधि दिलेली आहे. नविन प्रकल्पातसुध्दा रोजगारनिर्मिती ही होणारच आहे.

**प्रश्न** - तरी माझा प्रश्न आहे की प्रस्तावित उंदचन प्रकल्पातून नदीला जे पाणी जाणार आहे, त्यावर कर्जत तालुक्यातील ब-याच ग्रामपंचायतींच्या क्षेत्रातील जल योजना अवलंबुन आहे. तरी त्या ग्रामपंचायत जलयोजनेच्या पाणी उपलब्धेतवर या प्रकल्पाचा काही परिणाम होईल का याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आज जे पाणी नदीत जात आहे, त्यावर या प्रकल्पाचा काहीही परिणाम होणार नाही. त्यातील एक थेंबही पाणी कमी होणार नाही.

९) **<u>श्री. संतोष शिवाजी घाडगे, राहणार – तापकीरवाडी, भिवपुरी ग्रामपंचायत ग्रामस्थ, तालुका-कर्जत,जिल्हा-रायगड:-</u>**

**प्रश्न** - हा प्रकल्प विकसित करताना होणारे ब्लास्टींग, उत्खनन, त्यामुळे होणारे ध्वनी प्रदूषण, त्यामुळे पर्यावरणावर होणारे परिणाम, जंगलतोड त्यामुळे जंगलातील वानरे, डुक्करे व अन्य प्राणी हे गावात येऊन उभे पीक नष्ट करतात, फळांची नासाडी करतात. आम्ही गावकरी आताच त्रास भोगत आहोत. त्याबाबत कंपनीचे नियोजन काय आहे.

त्याचप्रमाणे ब्लास्टींगमुळे चार वर्षे पर्यवरणावर जो परिणाम होणार आहे, कंपनी रुग्णवाहिका ठेवणार आहे, टाटा कंपनी म्हणून आम्ही एक विश्वास ठेवतो. पण या चार वर्षाच्या कामामुळे येथील स्थानिकांना दीर्घ आजार निर्माण झाले, तर त्याबाबत टाटा कंपनीचे नियोजन याबाबत स्पष्टीकरण द्यावे.

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की अगोदरच सांगितल्याप्रमाणे कंट्रोल ब्लास्टींग करण्यात येईल. त्यामुळे ध्वनि प्रदूषण हे पारित मानकांमध्येच राहिल. तसेच गेले शंभर वर्षे कार्यरत असलेली वैद्यकीय सुविधा ही पुढेही तशीच उपलब्ध राहणार आहे.

**प्रश्न** - त्यावेळी काही स्थानिकांनी एराकत्रितपणे कंपनीच्या कामांमुळे जंगलातील प्राणी गावात येऊन धुडगूस घालतात असे सांगितले. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की जंगली प्राणी हे कारखान्यातसुध्दा येऊन येथील नुकसान करत आहेत.

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की प्रकल्पात कंट्रोल ब्लास्टींग करण्यात येईल. त्यांनी पुढे सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांनी जंगली जनावरांसाठी Bio-Diversity Conservation Plan तयार केलेला असून त्यासाठी आर्थिक नियोजन करण्यात आलेले आहे.

१०) **<u>श्री. बाजीराव दळवी, उपप्रमुख, शिवसेना तालुका - कर्जत, जिल्हा-रायगड:-</u>**

**प्रश्न** – श्री. बाजीराव दळवी यांनी उल्लेख केला कि – श्री. संतोष घाडगे यांना असे सांगायचे आहे की या प्रकल्पामुळे जंगलतोड होणार. त्यामुळे जंगलातील माकडे, इतर प्राणी हे जंगल सोडून गावात येतील व ते गावाचे नुकसान करणार आहेत, त्यावर प्रकल्प काय उपाययोजना करणार?

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की ६८ कोटींचा निधी हा Bio-Diversity Conservation Plan साठी राखीव ठेवण्यात आलेला आहे. त्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यातून काही उपाययोजना करण्यात येतील.

११) **<u>श्री. आर. के. कोलंबे, राहणार, नरसापूर ग्रामपंचायत, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड:-</u>**

**प्रश्न** - आम्हांला जे पाणी मिळते, त्यात काही कपात होणार आहे काय? यावर्षी आमच्या गावात २५% पाणी हे कमी येते. तर टाटांनी पत्र दिल्याने २५% पाणी हे कमी सोडतात असे सर्व ग्रामस्थ म्हणत असतात. मी लेखी सूचना/आक्षेप सादर केलेले आहेत.

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी आपल्या सूचना/आक्षेप असल्यासे ते लेखी स्वरुपात नोंदवू शकता.

आता पाण्याबाबत. तर या प्रकल्पामुळे आपल्या पाण्यात कुठलीही कपात होणार नाही. आता जे पाणी मिळते, तसेच प्रकल्प सुरु झाल्यानंतरही मिळणार आहे.

१२) **<u>श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, तेलंगणा राज्य –</u>**

**सुचना** - सर्व ग्रामस्थ आणि व्यवस्थापनाला माझ्या शुभेच्छा. ऑफ-स्ट्रीम ओपन लूप पंप स्टोरेज प्रोजेक्ट (PSP) ची प्रक्रिया निवडल्याबद्दल मी व्यवस्थापनाचे अभिनंदन करतो. भारतात, दहा प्रकारचे ऊर्जा प्रकल्प स्थापन केले आहेत - कोळसा, भरती-ओहोटी इ. भारतात, बेरोजगारी हे प्रमुख प्रदूषण आहे.

या प्रकल्पात ज्या काही नोकऱ्या दिल्या जातील, त्या स्थानिकांनाच दिल्या पाहिजेत. वृक्षारोपणासाठी, सामान्य वनस्पतींऐवजी, कृपया औषधी मूल्यवान झाडे आणि फळ देणारी झाडे लावण्यात यावीत. त्यांचा स्थानिकांना उपयोग होईल. पुढे CSR बजेटच्या खर्चासाठी स्थानिक प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिकारी, व्यवस्थापनातील अधिकारी, स्थानिक ग्रामपंचायत कार्यालय यांचा समावेश करून एक समन्वय समिती स्थापन करण्याची विनंती करण्यात येत आहे. त्याचा उपयोग आवश्यक असणा-या कामासाठी (Demand Oriented Work) होईल. त्यामुळे व्यवस्थापनास मोठी विश्वासार्हता प्राप्त होईल.

तुमच्या सल्लागाराने आधीच पाणी, हवा आणि जमिनीचे नमुने गोळा केले आहेत. ते खूप उपयुक्त आहे. शक्य असल्यास, मी पुढे लोकांच्या आरोग्याची सद्यस्थिती गोळा करण्याची सूचना करत आहे. तसेच पीक नमुना आणि भूजल उपलब्धता गोळा करण्यात यावी, त्यामुळे पॅरामीटर घेणे भविष्यात उपयुक्त ठरेल. शेवटी मी व्यवस्थापनाचे आणि सल्लागाराचे अभिनंदन करतो. मी भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाला या उद्योगाला बिनशर्त परवानगी देण्याची शिफारस करतो.

मी ५७ वर्षांचा पर्यावरणवादी आहे आणि या प्रकल्पामुळे परिसरातील गावांना कुठलाही त्रास होऊ नये अशी मी विनंती करतो. या प्रकल्पाला माझा पाठिंबा आहे.

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तक यांनी श्री. रेड्डी यांना सांगितले की आपण उपस्थित केलेल्या सूचनांचा निश्चितच विचार करण्यात येईल.

१३) **<u>श्री. संजय प्रभाकर रौंधळ, ग्रुप ग्रामपंचायत, भिवपुरी, मुक्काम -कराळेवाडी, जिल्हा-रायगड:-</u>**

**प्रश्न** - या प्रकल्पाच्या माध्यमातून जी रोजगार निर्मिती होणार आहे, ती तात्पुरती असणार आहे वा कायमस्वरुपी असणार आहे?

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की दोन्ही प्रकारची रोजगार निर्मिती असते. ज्यावेळी प्रकल्प बांधकाम टप्प्यात असतो, त्यावेळी निश्चितच जास्त प्रमाणात मनुष्यबळ लागते. प्रकल्प कार्यान्वित होईल, त्यावेळी रोजगारनिर्मिती कमी प्रमाणात होते.

१४) **<u>श्री. विशाल दिलीप पाटील, मुक्काम-मालेवाडी, अध्यक्ष,कर्जत तालुका, संभाजी ब्रिगेड:-</u>**

**प्रश्न** - १००० मेगावॅटचा प्रकल्प होतो, तर स्थानिकांना वीजपुरवठा करणार काय?

**उत्तर** - वीज पुरवठा करण्यासाठी आम्हांला त्यासाठी परवाना लागतो. तो अद्यापपावेतो आम्हांला मिळालेला नाही. त्यामुळे आम्ही वीज पुरवठा करु शकत नाही.

१५) **<u>श्री. नंदा बाळकृष्ण पाटील, राहणार-भालिवडी,तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड:-</u>**

**प्रश्न** - आज आपल्या परिसरात जी सभा चालू आहे, सभेचा हेतू म्हणजे कंपनीने जो प्रकल्प आणलेला आहे, त्या प्रकल्पात उणीव अशी आहे की या प्रकल्पामुळे शेतक-यांचा पाण्याचा प्रश्न हा सुटला पाहिजे. दुसरा प्रश्न येथील भिवपुरी कॅम्पमधील जी टाटाची शाळा आहे, ती परत चालू केली, तर चांगली गोष्ट होईल

त्याचप्रमाणे हॉस्पिटलचा जर प्रश्न सोडविला तर ते चांगले होईल.

जमशेटजी टाटा म्हणजे सत्यनारायण अशी येथील स्थानिक लोकांची श्रध्दा आहे.

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर देताना सांगितले की स्थानिकांना पाण्याच्या उपलब्धतेबाबत कुठलाच प्रश्न येणार नाही. आता जसे पाणी मिळते, भविष्यातही तसेच पाणी मिळत राहिल.

१६) **<u>श्री. मंगेश रामचंद्र शितोळे, राहणार – भिवपुरी कॅम्प, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड:-</u>**

**प्रश्न** - कंपनीने सांगितले की प्रकल्पासाठी ११७.४१ हेक्टरची आवश्यकता आहे. त्यात ९३.८२ हेक्टर ही कंपनीच्या मालकीची आहे. त्यापैकी ३४४.० हेक्टर जमिन ते खाजगी विकत घेणार आहेत. याचा अर्थ ५०.० एकर वनजमिन आहे. २३४.५० एकर जमिन ही कंपनीच्या मालकीची आहे, तर ८.५० ही खाजगी आहे. तर प्रश्न असा आहे की २३.६ हेक्टर जमिन आवश्यक असल्याचे प्रस्तावात नमूद केलेले आहे. जर टाटाकडे ९३.८२ हेक्टर जमिन आहे, तर वनजमिनीची आवश्यकता कशाला हवी?

महाराष्ट्र शासनाने प्रकल्पाचे क्षेत्र हे ESZ – Ecological Sensitive Zone म्हणून घोषित केलेला आहे, तर सदरहू प्रकल्पास वनजमिन दिल्यास तेथील संरक्षित वनस्पती व प्राणी (Protected flora and fauna) हे प्रभावित होणार नाहीत का?

**सुचना** - अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की वनक्षेत्राचा विषय हा केंद्र सरकारच्या अखत्यारित आहे. म्हणजे एक एकर वनक्षेत्र जमिन घेतली, तर शासनास दोन एकर जमिन द्यावी लागते. दुसरी गोष्ट हरितपट्टा विकसनाचे (green belt development) पैसे द्यावे लागतात. त्याशिवाय वनक्षेत्राजवळ दुप्पट जमिन द्यावी लागते.

श्री. मंगेश रामचंद्र शितोळे यांनी आक्षेप नोंदविला की ४.९१ कोटीला वन जमिन विकत घेतली जाणार आहे. त्यावेळी अध्यक्ष यांनी सांगितले की वनजमिनीचे मुल्यांकन केले जाते व त्यांनी जेवढी जमिन अधिग्रहित केली, त्याच्या दुप्पट जमिन द्यावी लागते. श्री. मंगेश रामचंद्र शितोळे यांनी आक्षेप नोंदविला की येथे शासनाचा महसूल तोटा होणार आहे. अध्यक्ष यांनी याबाबत लेखी हमी घेण्याचे आश्वासन दिले.

**१७) श्री. नागेश विष्णु बार्शी, राहणार- हुमगाव, जिल्हा-रायगडः-**

**प्रश्न** - कंपनीचा जो दवाखाना चालू आहे, तो विशिष्ट कालावधीसाठीच चालू असतो. (सकाळी ९.०० ते ११.००). तर तो ग्रामस्थांसाठी चोवीस तास खुला राहिल का व त्यात अजून सुधारणा होतील काय?

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तक यांनी सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.

**१८) श्री. श्रीराम वसंत ठोंबरे, माजी सरपंच, राहणार-हुमगाव,जिल्हा-रायगडः-**

**आक्षेप** - येथे १५-२० ग्रामपंचायत क्षेत्रातील लोक आलेले आहेत. माईक द्या.

**उत्तर** - माईकची व्यवस्था सर्वांना करण्यात आली.

**१९) श्री. सुनील बार्शी, राहणार-हुमगाव, जिल्हा-रायगडः-**

**प्रश्न** - पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासाठी सर्वेक्षण करताना किती ठिकाणी जल, हवा, माती, ध्वनी यांचे निरिक्षण करण्यात आलेले आहे?

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले कि, सादरीकरणात सर्व तपशील दाखविण्यात आलेले होता की किती ठिकाणी जल, माती, ध्वनी यांचे निरिक्षण करण्यात आले.

**२०) सौ. अलका अनिल बडोले, राहणार-भिवपुरी, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगडः-**

गेले दहा वर्षे मी भिवपुरी या गावात राहते. मी एक गृहिणी म्हणून घरात होते. मी एक संस्थेत ३-४ वर्षे काम केले. नंतर अनोखा धागा यातून मला एक ऑफर आली. माझा टेलरिंग कोर्स हा झालेला होता. त्यामुळे

तेथील महिलांना प्रोत्साहन देत मीही काम करु लागले. माझा उदरनिर्वाह मी भागवू शकत होते. महिलाना स्वावलंबी होऊन स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे. मी कंपनीच्या सीएसआर उपक्रमात काम करते, तेथे एमब्रॉयडरी, वगैरे शिकवतात. त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रश्न उपस्थित करण्याची सूचना केली. पर्यावरणविषयक काही प्रश्न असल्यास तो उपस्थित करण्यात यावा.

**सुचना** - त्यांनी सांगितले की नविन प्रकल्पात जसे पुरुषांना रोजगाराची संधि देण्यात येईल, त्याचप्रमाणे महिलांनाही रोजगाराची संधि देण्यात यावी.

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तकांनी आश्वासन दिले की अनोखा धागा उपक्रमाची व्याप्ती वाढविण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत.

**२१) <u>डॉ. सतिश पांडे, ईला फाऊन्डेशन :-</u>**

**सुचना** - गेले ४० वर्षे आम्ही पर्यावरण क्षेत्रात काम करत आहे. ग्रामस्थांबरोबर काम करतो. गेले ३० वर्षे मी टाटा पॉवरबरोबर काम करत आहे. बैठकीत रानडुकरांचा उपद्रव, शेतक-यांचे नुकसान याबाबत प्रश्न विचारण्यात आले तर टाटा कंपनीने आम्हांस सुचना केलेली होती की या भागातील जी bio-diversity आहे, ती कुठली आहे, म्हणजे त्याप्रमाणे पुढील संवर्धन योजना राबविण्यात येतील. तर गेले तीस वर्षे या भागातील पक्षी कुठले आहेत, प्राणी कुठले आहेत, वनस्पती कुठल्या आहेत, येथे बीयाणे कुठली उपलब्ध आहेत, उभयचर (amphibian) प्राणी कुठले आहेत, सरपटणारे प्राणी याची सविस्तर माहिती प्रकाशित केलेली आहे. भारतात अशा कमी कंपन्या आहेत की त्यांनी टाटा पॉवर सारखे शास्त्रीय नोंद घेतलेली आहे. तरी सदरहू बाब ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीच्या इतिवृतात समावेश करणे गरजेचे आहे. येथे असा आक्षेप नोदविण्यात आला की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात सरपटणा-या प्राण्यांचा – सापांविषयाचा दस्तावेज नाही. तर सापांविषयी सर्व पुस्तकच उपलब्ध आहे. तर फक्त दस्तावेज पर्यंत न थांबता रानडुकरांचा उपद्रव सहन करताना ती का येतात, किती प्रमाणात आहेत, त्यावर उपाय काय हे पाहणे महत्वाचे आहे. मी स्वतः पुण्याचा Hon. Wildlife Warden आहे.

यासाठी Joint Forest Management Committees जर स्थापन केल्या आणि कशामुळे रानडुकरे येतात हे कळले तर टाटा पॉवरला मी विनंती करेन की रानडुकरे येणार नाहीत, अशा प्रकारचा हरितपट्टा विकसित करु शकतो. या प्रकारचे उपाय उपलब्ध आहेत.

दुसरी गोष्ट – ग्रीन पॉवर ही महत्वाची आहे. माझे वैयक्तिक मत आहे की येथे कुठल्याही प्रकारचे पाण्याचे प्रदूषण होत नाही. प्रकल्पातील वापरलेले पाणी परत ग्रीन पॉवरसाठी वापरले जात आहे. आम्ही

ग्रामस्थांसाठी दवाखाना चालवितो व रानटी जनावरांसाठी Wild Life Hospital सुध्दा चालवितो. माझे वैयक्तिक मत आहे की ग्रीन पॉवर अतिशय सुंदर प्रकल्प असून जेवढे शक्य आहे, तेवढा आपण या प्रकल्पास पाठिंबा देण्याचा प्रयत्न करुया.

दुसरी गोष्ट हा प्रकल्प राष्ट्रीय हिताचा आहे. या प्रकल्पाकडे सकारात्मक बघितले आणि टाटा पॉवरने त्याच संवेदनशीलतेने स्थानिकांचे प्रश्न सोडविले, तरी प्रकल्पाबाबत bio-diversity चा दस्तावेज तयार आहे. अहवालात त्रुटी राहिलेली नाही.

**२२) श्री. अरुण नारायण भोईर, माजी सरपंच, मांडवणे, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगडः-**

आज मी माझे भाग्य समजतो की रतन टाटांनी आमच्या परिसरात एवढ्या चांगल्या प्रकल्पाची उभारणी केलेली आहे. त्यामुळे येथे रोजगाराची संधि मिळणार आहे.

**प्रश्न** - मात्र मी जिल्हाधिकारी-रायगड यांच्या प्रतिनिधीसमोर प्रश्न विचारत आहे की यांचे शंभर वर्षांचे मंडळ आहे, येथे जे काम झाले, ते स्थानिक लोकांनी केलेले आहे. मा. रतन टाटा यांनी करोना काळात पंधरा हजार कोटी रुपये या देशासाठी दिले. ते काम आमच्या स्थानिक लोकांनी केलेले आहे. तसेच प्रकल्पात १,५०० कामगार आहेत, त्यांना कंपनीने काहीही दिलेले नाही.

टाटा कंपनीचे Consumer Center होते. येथे शाळा होती, ती बंद केली आणि दवाखाना एक तासच चालू असतो किंवा दोन दिवसच चालू असतो. स्थानिक लोकांच्या गरजा बंद करण्यात आलेल्या आहेत. जर येते रोजगार उपलब्ध होत आहे, तर कंपनीने आमच्या १,५०० कामगारांना कंपनीने न्याय द्यावा.

**२३) श्री. अतुल विनायक सोमणे, मुक्काम -कराळेवाडी, जिल्हा-रायगडः-**

**प्रश्न** - प्रकल्प प्रवर्तकांनी आम्हांला समाधानकारक उत्तर दिलेले नाही. कंपनीच्या हद्दीला लागून ग्रामस्थांच्या जमिनी आहेत. कंपनीने कुठलाही प्रकल्प राबवावा, त्याला आमचा आक्षेप नाही. पण प्रकल्पातील पाण्यामुळे आमच्या जमिनी जर नापीक झाल्या, तर आम्ही काय पिकविणार?

तर नुकसानभरपाई संदर्भात लेखी स्वरुपात प्रथम उत्तर देण्यात यावे, नंतरच कंपनी चालू करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात यावी.

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की येथे हमी देण्यात येते की तुमच्या जमिनीला कसल्याही प्रकारचा धोका होणार नाही, याची काळजी आम्ही घेऊ. तुमच्या जमिनीवर प्रकल्पातील पाण्याचा कसलाही परिणाम होणार नाही.

**२४) <u>श्री. मंगेश रामचंद्र शितोळे, राहणार – भिवपुरी कॅम्प, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगडः</u>**

**आक्षेप** - निम्म जलाशयामुळे तेथील भूगर्भातील पाण्याचे स्रोत हे कायमचे बंद होतील. त्याचा परिणाम आमच्या भिवपुरी गावातील ऐतिहासिक तलाव आहे, तो भिवपुरीपासून ६०० मीटर अंतरावर आहे. त्याचा उल्लेख अहवालात नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की आपण आपले निवेदन लेखीस्वरुपातसुध्दा देऊ शकतात. त्याचे लेखी उत्तर प्रकल्प प्रवर्तकांनी देणे हे बंधनकारक आहे.

**उत्तर** - लेखी उत्तर सोबत जोडले आहे.

**२५) <u>श्री. नामदेव लक्ष्मण गायकवाड, माजी सरपंच, मांडवणे, तालुका-कर्जत, जिल्हा – रायगडः-</u>**

**आक्षेप** - टाटा कंपनीचे आम्ही आभारी आहोत, कारण त्यांनी आमच्यासाठी भरपूर उपक्रम राबविलेले आहेत. प्रकल्पाच्या शेजारी धनकरवाडा हे गाव आहे. त्या गावासाठी रस्ता नाही. काल त्यांच्या गावात मयत झाली, तर तेथील माणसांनी ते शव कट्यावरुन काढले.

**२६) श्री. जितेंद्र घाडगे, राहणार – तापकीरवाडी, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगडः- --**

**सुचना** - काल जेथे मयत झाली, त्या लोकांनी कंपनीला बरीच विनंती केली की आम्हांला गेट उघडून द्या, आम्हांला मयत काढायची आहे. कंपनीने ते ऐकली नाही, कुठल्याही प्रकारची मदत केली नाही. शेवटी त्यांना कट्ट्यावरुन उचलून मयत काढावी लागली. अशी परिस्थिती भविष्यात होणार नाही अशी टाटा कंपनीने काळजी घ्यावी.

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तक यांनी वरिल श्री. गायकवाड व श्री घाडगे यांना उत्तर देताना सांगितले की तो व्हिडिओ बघताना मला रडू आले. अशा वेळेस स्थानिकांनी कंपनीशी संपर्क साधावा, ही बाब निश्चितच चांगली नाही.

**सुचना** - अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री घाडगे यांना सूचना केली की आचारसंहितेनंतर आपण जिल्हाधिकारी कार्यालय,अलिबाग,रायगड येथे भेटण्यास यावे. कंपनीकडून याबाबत पुढील कार्यवाही न झाल्यास पर्यायी रस्त्याबाबत त्वरित कार्यवाही करण्यात येईल. जर वनक्षेत्र असेल तर त्याबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल.

२७) **श्री. दिनेश थोरवे, कराळेवाडी गाव, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगडः-**

**प्रश्न** - कंपनीच्या शेजारी सर्व शेतकरी कुटुंबे राहतात. कंपाऊंडच्या बाहेर पूर्ण शेती असल्याने शेतक-याला शेतात शेततळे किंवा विहिर खोदायची असेल, तर त्या बाबत शासन ना हरकत प्रमाणपत्र देऊ शकते काय?

दुसरा प्रश्न – प्रकल्प परिसरात बरीच आदिवासी कुटुंबे आहेत. त्यांचा उदरनिर्वाह हा रानमेवा, जंगलातील फळे विकूनच होत असतो. तर त्यांच्यासाठी जंगलात कंपनी रस्ता तयार करुन देऊ शकते काय?

**सुचना** - अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे माहिती दिली की हा टाटाचा विषय होत नाही. तर जे वननिवासी आहेत, त्यांच्यासाठी शासन क्षेत्र राखीव ठेवते. एक हेक्टरपर्यंत जे क्षेत्र असेल, तर ३.२ नुसार जिल्हा वन अधिकारी ते क्षेत्र वननिवासींना वापरण्यास देऊ शकते. तसे असल्यास जिल्हाधिकारी,रायगड यांनी लेखी अर्ज सादर करण्यात यावा. तर त्यांच्या जाण्यायेण्यासाठी रस्ता आणि आदिम जमातींना उपजिविकेसाठीची जागेबाबत निर्णय घेता येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की शासनाचा धोरणात्मक निर्णय आहे की विहीर खणावयाची असल्यास त्यास भूवैज्ञानिक विभागाची परवानगी घ्यावी लागते. त्याचे कार्यालय अलिबागला आहे. शेततळ्याबाबत नाही, पण विहिरीचा विषय येऊ शकतो. कारण शेततळे एक फूट खोदतो व तीन फूट भरतो. विहिर खणताना ब्लास्टींगसाठी स्ट्रकचरल ऑडिटबाबत विचार करावा लागेल. त्यासाठी बैठक लावता येईल.

२८) **श्री. नागेश विष्णु बार्शी, राहणार- हुमगाव, जिल्हा-रायगडः-**

**प्रश्न** - माझा प्रश्न आहे की प्रकल्प काळात कामगार किती लागतील व त्यांना कायमस्वरुपी रोजगार मिळणार वा नाही.

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्प बांधकाम टप्प्यात जास्त कामगारांची गरज असते. त्यावेळी १,०००-१,५०० कामगार लागू शकतात. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर ती संख्या कमी होते.

२९) **श्री. अतुल विनायक सोमणे, मुक्काम -कराळेवाडी, जिल्हा-रायगडः-**

**आक्षेप** - प्रकल्प प्रवर्तक श्री काळे फक्त बोलतात. चार वर्षांनी प्रकल्प संपल्यानंतर शेतीला नूकसान झाले तर भरपाई देणार आहेत काय? लेखी स्वरुपात उत्तर पाहिजे.

३०) **श्रीमती सीताबाई सिद, मुक्काम - धनगर वाडा, कराळेवाडी जिल्हा-रायगडः-**

**आक्षेप** - एका महिलेने तक्रार केली की आम्हांल रस्ता नाही, पाणी नाही. पोरेबाळे घेऊन आम्ही जायचे कुठे?

**३१) श्री. अतुल विनायक सोमणे, मुक्काम -कराळेवाडी, जिल्हा-रायगड:-**

**प्रश्न** - टाटा पॉवर कंपनीची जबाबदारी फक्त चार वर्षे आहे का कायमस्वरुपी आहे हे कंपनीने येथे सांगावे. ते लेखी स्वरुपात द्यावे.

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की बराच वेळा सांगण्यात आलेले आहे की परिसरातील शेतजमिनवर काहीही परिणाम होणार नाही.

**३२) श्री. नागेश विष्णु बार्शी, राहणार- हुमगाव, जिल्हा-रायगड:**

**प्रश्न** - कामगार कायमस्वरुपी की तात्पुरते घेणार?

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की बांधकाम टप्प्यात विविध खाजगी कंत्राटदारांकडून कामगार नियुक्त करण्यात येतील, प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ज्या संवर्गातील कामगारांची गरज आहे, म्हणजे त्यांच्या शैक्षणिक अहर्तानुसार त्यांना प्रत्यक्ष किंवा खाजगी कंत्राटदारांकडुन रोजगाराची संधि देण्यात येईल.

**३३) श्री. सुनील मसणे, सरपंच, पोटल ग्रामपंचायत, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड:-**

**प्रश्न** - आमच्या शेतीला पाणी टाटा पॉवर देत आहे. तसेच १,००० मेगावॅट प्रकल्प होणार आहे, तर परिसरातील लोकांना कंपनीने वीज उपलब्ध करुन द्यावी. आपण सांगितले की शासनाकडून परवानगी मिळत नाही. जर मुंबईला विकायला परवानगी मिळते, तर येथील शेतकरी, स्थानिकांना वीज देण्यास परवानगी का मिळत नाही?

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की परवाने तीन प्रकारचे असतात. एक वीज निर्मिती, दुसरा वीज पारेषण आणि तिसरा वीज वितरण.

घरामध्ये जी वीज मिळते, ती वीज वितरण कंपनीकडून मिळते. टाटा कंपनीस वीज निर्मिती, वीज पारेषण (transmission) ची परवानगी आहे, मात्र वितरणाची परवानगी नाही.

**प्रश्न** — श्री. सुनील मसणे यांनी मत मांडले की या प्रकल्पाचा त्रास आम्ही भोगणार, तर अंतिम उत्पादनाचा फायदा आम्हांला मिळणे गरजेचे आहे.

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की येथील जनतेने आम्हांला परवानगी आणून दिली तर आपणास वीज देण्यास आम्हांला आनंदच होईल. श्री. मेसणे यांनी आश्वासन दिले की याबाबत स्थानिक जनता ही कंपनीबरोबर राहतील.

**३४) श्री. हेमंत लक्ष्मण नवले, राहणार-तापकीरवाडी, भिवपुरी ग्रामपंचायत, जिल्हा-रायगड:-**

**प्रश्न** - मी आपणास विनंती करतो की प्रकल्पासाठी जंगलतोड होणार आहे. जंगलात आयुर्वेदिक झाडे आहेत. तर त्यासाठी कंपनीचे काय नियोजन आहे?

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की याबाबत वनविभागाचे नियम आहेत. ते संपूर्णपणे पाळण्यात येतील. त्यात सर्वेक्षण, अहवाल सादर करणे आहे याचा समावेश असून वनविभागाचे निर्देस पाळण्यात येतील.

**३५) <u>श्री. संतोष शिवाजी घाडगे, राहणार – तापकीरवाडी, भिवपुरी ग्रामपंचायत ग्रामस्थ, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगडः-</u>**

**प्रश्न** - तलावाची निर्मिती होणार आहे. मात्र काही आपत्कालिन परिस्थिती आल्यास त्याबाबत कायमस्वरुपी उपाययोजना करणार आहात काय? त्याची अहवालात नोंद होणे गरजेचे आहे.

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तक यांनी याबाबत आश्वासन दिले. त्यासाठी काही तरतुदी असतात. त्यांनी सांगितले की पाण्याचा साठा हा फक्त ४.५० दशलक्ष घनमीटर आहे. त्यापैकी अर्धे पाणी हे खड्ड्यात साठविले जाणार आहे आणि अर्धे धरणाच्या भिंतीमुळे साठविले जाणार आहे. त्यातही आपत्कालिन परिस्थिती आली तर पाणी सोडण्याची व्यवस्था ही करावीच लागते.

**३६) <u>श्री. अतुल विनायक सोमणे, मुक्काम -कराळेवाडी, जिल्हा-रायगडः-</u>**

**आक्षेप** - उत्तर देणारे प्रकल्प अधिकारी हे सेवानिवृत्त होतील. मात्र दिलेली आश्वासने कंपनीने पाळलीच पाहिजे. टाटा पॉवर भिवपुरी ग्रामपंचायतीत असून भिवपुरीतील घरातला एकही माणूस हा टाटा पॉवरमध्ये नाही. तरी सर्व आश्वासने ही लेखी स्वरुपातच देणे अपेक्षित आहे. कारण आपण कुठलेही उत्तर समाधानकारक दिलेले नाही.

**सुचना** - अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की बैठकीत अनेक उपस्थितांनी प्रश्न, सूचना, आक्षेप नोंदविलेले असून त्याची नोंद घेण्यात आलेली आहे. स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ईमेल आयडी वर लेखी प्रश्न, पर्यावरण हरकती विचारु शकतात. त्याचे उत्तर कंपनीकडून लेखी स्वरुपात घेऊन ते इतिवृतासोबत भारत सरकारला सादर करण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पुढे सांगितले की बैठकीच्या सुरवातीसच आयोजक यांनी सांगितलेले आहे की ही समिती कोणताही निर्णय घेत नाही, आपण उपस्थित केलेले सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यासाठीच ही समिती गठित करण्यात आलेली आहे. बैठकीचे इतिवृत भारत सरकारला सादर करण्यात येईल, तेथील तज्ज्ञ समिती ही त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेते.

**३७) <u>श्री. शिवाजी दिसले, राहणार-तापकीरवाडी, भिवपुरी ग्रामपंचायत, जिल्हा-रायगडः-</u>**

**आक्षेप** - उपस्थितांना आवाहन करण्यात येते की आपल्या क्षेत्रात एवढा मोठा प्रकल्प टाटा कंपनी उभारत आहे, तर त्यासाठी आभारयुक्त टाळ्या वाजविण्यात याव्यात. सर्व लोकांनी टाळ्या वाजून स्वागत केले.

श्री. दिसले यांनी मत मांडले की येथे पर्यावरण संदर्भात बोलण्यास आलेलो होतो. येथे सर्वजण एकच प्रश्न विचारत आहेत की उद्याची जबाबदारी कोण घेणार आहे?

मी कंपनीच्या शेजारी राहणार शेतकरी आहे. येथे आत येताना सर्व सुरक्षाप्रणालीतून गेल्यानंतरच प्रवेश मिळतो. जर आमची जमिन बाधित झाली, तर आमचे कुटुंब कसे पोसणार? कारण टाटात काही आम्हांला नोकरी नाही. तरी काही नुकसान झाल्यास टाटाने कायमस्वरुपी मदत करावी.

**३८) <u>श्री. सुनील बार्शी, राहणार-हुमगाव, जिल्हा-रायगड:-</u>**

**प्रश्न** - हा प्रकल्प सुरु होण्यापूर्वी येथे ब्लास्टींग होईल, तर ब्लास्टींगमध्ये काही घातक कचरा निघू शकतो का, त्याची विल्हेवाट कशी लावण्यात येणार?

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की बैठकीत अगोदरच सांगण्यात आलेले आहे की प्रकल्पात कंट्रोल ब्लास्टींग करण्यात येणार आहे. त्यातून निघणा-या कच-याची विल्हेवाट ही शासनाच्या निर्देशांप्रमाणेच करण्यात येईल.

**३९) <u>श्री. महेश गाडे, राहणार-कराळेवाडी, भिवपुरी ग्रामपंचायत, जिल्हा-रायगड:-</u>**

**प्रश्न** - कंपनी जे पेज नदीला पाणी सोडते, त्याचा प्रवाह प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर किती राहिल?

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की या प्रकल्पामुळे आताच्या पाणी उपलब्धतेवर किंवा प्रवाहावर कोणताही परिणाम होणार नाही.

श्री. गाडे यांच्या प्रश्नास उत्तर देताना प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की या प्रकल्पातून खाली पाणी सोडलेच जाणार नाही. या प्रकल्पामुळे कुठल्याही जलस्त्रोतावर, पाणी उपलब्धतेवर परिणाम होणार नाही.

श्री. गाडे यांनी आरोप केला की नदीपात्रात अतिक्रमण झालेले असुन त्यावर पाटबंधारे विभाग व अन्य शासकीय विभाग काहीही कारवाई करत नाही.

**सुचना** - अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीनंतर लेखी अर्ज त्वरित सादर करण्यात यावा, अतिक्रमणाबाबत त्वरित पुढील कारवाई केल्याचे दिसून येईल.

**४०) <u>श्री. जितेन्द्र घाडगे, राहणार-तापकीरवाडी, भिवपुरी ग्रामपंचायत, जिल्हा-रायगड:-</u>**

**प्रश्न** - टाटा कंपनीच्या शेजारी धनगरवाडा ही वस्ती आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्यांना येण्याजाण्यासाठी पर्यायी रस्ता कोणता आहे? कारण पावसाळ्यात तेथे पूर्ण शेती आहे.

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की संबंधित वस्तीस चांगला रस्ता उपलब्ध करुन देण्यात येईल.

**सुचना** - काही उपस्थितांनी एकत्रित मागणी केली की त्यांना कायमचा चांगला रस्ता देण्यात यावा, नंतर तो जंगलातील रस्त्यांना जोडण्यात यावा.

**उत्तर** - त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सागितले की या प्रश्नावर अध्यक्ष यांनी आधीच स्पष्टीकरण दिलेले आहे.

येथे काही उपस्थितांनी एकत्रित मागणी केली धनगरवाडा येथील रहिवाशी हे या प्रकल्पामुळे सर्वात जास्त बाधित होणार आहेत, तरी त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्यात यावा, याची नोंद इतिवृतात घेण्यात यावी.

**सुचना** - अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सर्व सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येत आहे. तसेच उपस्थितांना सूचना करण्यात येत आहे की प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणी. सूचना, आक्षेप लेखी स्वरुपात ते जिल्हाधिकारी कार्यालय, अलिबाग,रायगड / स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियेत्रण मंडळ, रायगड भवन, नवी मुंबई येथे प्रत्यक्ष किंवा ईमेलव्दारे सादर करु शकतात. बैठकीच्या इतिवृत्तासोबत ते भारत सरकारला सादर करण्यात येईल.

**४१) <u>श्री. विकास नवले, मुक्काम - तापकीरवाडी, जिल्हा – रायगड:-</u>**

**आक्षेप** - टाटा कंपनीची अक्षम्य चूक झालेली आहे की अहिल्याबाई होळकर पांडवकालीन तलाव आहे, त्याची अहवालात कुठेही नोंद झालेली नाही. शासनाच्या गॅझेटमध्ये नोंद आहे, ती नोंद का घेण्यात आलेली नाही. कारण तेथे बाहेरुन पर्यटक येतात, प्रकल्पामुळे रहिदारी वाढली तर पर्यटक येणार नाहीत.

**उत्तर** - प्रकल्प प्रवर्तक यांनी आश्वासन दिले की सुधारित ईआयए अहवालात त्याची नोंद घेण्यात येईल.

**सुचना** - अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की तशी नोंद अहवालात घेण्याची सूचना करण्यात येते. त्याचप्रमाणे पर्यटक येण्यावर कुठलाही परिणाम होणार नाही यांची काळाची घेण्याची प्रकल्प प्रवर्तकांना सूचना करण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीच्या इतिवृताची प्रत ही ग्रामपंचायत कार्यालयास उपलब्ध करुन देण्यात येईल.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की लेखी सूचना, आक्षेप यांची म. प्र. नि. मंडळाच्या ई-मेल आयडीवर नोंद करण्यात यावी. त्याचप्रमाणे बैठकीचे इतिवृतसुध्दा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात येईल.

**४२) <u>श्री. अरुण नारायण भोईर, माजी. सरपंच मांडवणे, तालुका - कर्जत, जिल्हा – रायगड:-</u>**

**सुचना** - माझी विनंती आहे की १९८६ साली स्थानिक लोकांसाठी एक प्रशिक्षण केंद्र बांधलेले होते. परंतु तेथे आजपर्यंत कोणालाही प्रशिक्षण देण्यात आलेले नाही. तेथे आता दवाखान्याची इमारत बांधत आहेत. कंपनीला विनंती आहे की स्थानिक लोकाधिकार समितीचा कंपनीबरोबर जो करार होता, त्याचे पालन कंपनीने करावे. अन्यथा, आमचे कामगार नविन प्रकल्प विकसित करताना एकही दगड उचलून देणार नाही.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करण्यात येत आहे असे सांगितले. त्यांनी उपस्थितांना आवाहन केले की ज्यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदवायचे असल्यास त्यांनी ईमेलव्दारे वा लेखी स्वरुपात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या रायगड भवन, नवी मुंबई कार्यालयात सादर करण्यात यावे. त्याची पोच देण्यात येईल व त्यास लेखी उत्तर देण्याची सूचना प्रकल्प प्रवर्तकांना अगोदरच सांगण्यात आलेली आहे.

बैठकीचा समारोप करताना आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि मा. अध्यक्ष यांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

सोबत प्राप्त झालेल्या ११ लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडत आहोत.

**(रा. सं. कामत)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-२
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन, नवी मुंबई

**(जयवंत शं. हजारे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन,नवी मुंबई

**(संदेश शिर्के)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,
जिल्हा - रायगड